Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २२९ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.३० मे २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### उद्धव ठाकरेच लोकसभेत 'मॅन ऑफ द सिरीज' ठरतील

**परभणी–**मुळात राज्यात मराठा ओबीसी वाद हा भाजप अन त्यांच्या नेतृत्वानेच लावला, असे आरोप ठाकरे गटाचे नेते आणि परभणी लोकसभेचे उमेदवार संजय उर्फ बंडू जाधव यांनी केला. तसेच बीडमध्ये घडलेली घटना पुन्हा घडू नये, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ते एका वृत्तवाहिणीशी बोलत होते. यावेळी त्यांनी लोकसभेत उद्धव ठाकरेच मॅन ऑफ द सिरीज ठरतील, असा दावा देखील केला.संजय जाधव यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेचे जोरदार समर्थन केले. आजपर्यंत ओबीसींसाठी छगन भुजबळ, महादेव जानकर, प्रकाश शेंडगे, गोपीचंद पडळकर यांच्यासह अनेकांनी लढा दिला. सगळ्या समाजांनी रस्त्यावर उतरुन, सरकारवर दबाव आणून काही मागण्या मान्य करुन घेतल्या. त्यामध्ये मराठा समाजाच्या पुढाऱ्यांनी तसाच प्रयत्न केला तर पोटात दुखायचं कारण काय? प्रत्येकाला स्वत:च्या समाजासाठी गोष्टी मागण्याचा नैतिक अधिकार आहे. या गोष्टी मिळवण्यासाठी मराठा रस्त्यावर उतरला तर तो दोषी आहे का?, मराठ्यांनी ओबीसीतून किंवा सगेसोयऱ्याचे आरक्षण मागणे चुकीचे आहे का?, असा सवाल जाधव यांनी भाजपसह महायुतीला विचारला.

### आव्हाडांच्या कृतीने राज्यभरातून संताप

**मुंबई–**मनुस्मृती दहन करण्याकरिता महाड येथे पोहोचलेले शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड चांगलेच अडचणीत सापडले आहेत. मनुस्मृती लिहिलेले पुस्तक फाडत असताना, त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो फाडला. त्यामुळे त्यांच्यावर राज्यभरातून टिकेची झोड उठली. या प्रकरणी राज्यभरातील नेत्यांनी आणि आंबेडकरवादी कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला आहे. त्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी देखील सर्वांची माफी मागितली आहे.या संदर्भात जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मनुस्मृतीचे दहन करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पोस्टर अनावधानाने फाडले गेले आहे. या मागे आमचा कोणताही दुसरा हेतू नव्हता. मात्र, कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी माफी मागतो, पण आम्ही हे मुद्दाम केलेले नाही. या संदर्भात विरोधकांना राजकारण करायचे असल्याने ते अनेक मागण्या करतील. मात्र, मी त्यावर काहीही बोलणार नाही. कोणाच्या भावना दुखवल्या असतील तर माफी मागतो, असे स्पष्टीकरण जितेंद्र आव्हाड यांनी घडलेल्या घटनेवर दिले आहे. मी आजपर्यंत कधीही माफी मागितलेली नाही. मात्र, या वेळी माफी मागतोय, यावरुन ते माझ्या मनाला किती लागले हे लक्ष्यात आले असेल, असेही जितेंद्र आव्हाड यांनी म्हटले आहे. महाराष्ट्राच्या जनतेने मला माफ करावे, असेही आव्हाड म्हणाले.

### सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेवर प्रशासक नेमा

**सांगली–**सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील घोटाळा प्रकरणी जिल्हा बँकेवर प्रशासक नेमा अन्यथा भ्रष्टाचार प्रवृत्ती ठेचून काढण्यासाठी रस्त्यावर उतरू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी सरकारला दिला आहे. शेट्टी यांनी त्यांच्या मागण्यांचे निवेदन सरकारकडे नुकतेच पाठविले आहे.बँकेवर प्रशासक नेमण्याबरोबर बँकेची सखोल चौकशी करा,अशी मागणी राजू शेठ्ठी यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्याकडे यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी सरकारला दिले आहे.सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सहा शाखांमध्ये दोन कोटी ४३ लाखांचा दुष्काळ आणि अवकाळी निधीवर डल्ला मारण्याचा प्रकार शाखाधिकारी व कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्याचा समोर आला.

## बिल्डर, मंत्री, आमदार कुणीही असो, सोडू नका

# हिट अँड रन प्रकरणात मुख्यमंत्री शिंदे यांचे पुण्याच्या पोलिस आयुक्तांना निर्देश

**पुणे (वृत्तसंस्था)–**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यातील हिट अँड रन प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी या प्रकरणी थेट पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी चर्चा करून त्यांना या प्रकरणात कुणी कितीही मोठा व्यक्ती अडकला असेल तरी त्याच्यावर बेधडक कारवाई करण्याचे निर्देश दिलेत. मुख्यमंत्री स्वतः या प्रकरणी पुण्याला भेट देण्याचीही शक्यता आहे.पुण्यातील कल्याणीनगर परिसरातील पोर्शे कार अपघाताप्रकरणी आतापर्यंत १० जणांना अटक झाली आहे. यात २ तरुण अभियंत्यांचा बळी घेणाऱ्या अल्पवयीन आरोपीसह त्याचे वडील विशाल अग्रवाल व आजोबा सुरेंद्र अग्रवाल यांचाही समावेश आहे. या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप वाढल्याच्या पार्श्वभूमीवर तपासाचा गुंता वाढला आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी चर्चा करून त्यांना या प्रकरणात कडक कारवाई करण्याचे निर्देश दिलेत. अल्पवयीन आरोपीच्या वडील व पालकांवर पोर्शे कारच्या ड्रायव्हरवर गुन्हा अंगावर घेण्यासाठी दबाव टाकल्याचा आरोप आहे.यासंबंधीच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्याशी जवळपास १० मिनिटे चर्चा केली. त्यात त्यांनी या



प्रकरणात कुणीही कितीही मोठा आरोपी असला तरी त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. या प्रकरणातील आरोपींची सखोल चौकशी करून या प्रकरणात सहभागी असणाऱ्या शेवटच्या आरोपीपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न करा. या प्रकरणीमंत्री, बिल्डर, आमदार कुणीही आडवा आला तरी त्याला सोडू नका. त्यालाही या प्रकरणात आरोपी करा. या प्रकरणाच्या माध्यमातून समाजात चांगला संदेश गेला पाहिजे. सरकार पोलिसांच्या पाठिशी आहे. कोर्टात केस टिकेल अशा पद्धतीने तपास करा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री शिंदे यांनी अमितेश कुमार यांना दिले आहेत. विशेषतः मुख्यमंत्री शिंदे या प्रकरणी स्वतः पुण्याच्या दौऱ्यावर जाऊन स्थितीचा आढावा घेणार आहेत.दुसरीकडे, या प्रकरणात संघटीत गुन्हेगारीचे कलम वाढवता येईल का? यावरही वरिष्ठ पातळीवर विचार सुरू असल्याचीही माहिती आहे. यामुळे या प्रकरणाची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे.पोर्शे अपघात झाल्यानंतर अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील टिंगरे यांना फोन केला होता. त्यानंतर टिंगरे पहाटेच पोलिस ठाण्यात गेले होते. त्यानंतर विरोधकांनी त्यांच्यावर पोलिसांवर दबाव टाकल्याचा आरोप केला होता. या सर्व पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी फोन करत कोणत्याही दबावाला बळी न पडता योग्य तपास करा, सरकार तुमच्यासोबत असल्याचे सांगितले आहे.

## डोंबिवली स्फोटातील मुख्य आरोपी मालती मेहता पोलिसांच्या ताब्यात

**नाशिक–**ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली एमआयडीसीमधील कंपनीत भयानक स्फोट झाला होता. या स्फोटामुळे आतापर्यंत ११ जणांना जीव गमवावा लागला आहे. तर कित्येक जण जखमी झाले आहेत. या प्रकरणी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे. तसेच संबंधीत अमुदान कंपनीचे मालक मालती मेहता यांना नाशिकच्या मेहेरधाम परिसरातून ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी मालती आणि मलय मेहता यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डोंबिवली एमआयडीसीमधील अमुदान कंपनीत रिक्टरचा स्फोट झाल्याने ही दुर्घटना झाल्याची माहिती समोर आली आहे. या कंपनीतील बॉयलरचा स्फोट झाल्याचे सुरूवातीला सांगण्यात येत होते. आगीवर नियंत्रण मिळवल्यानंतर या प्रकणी अग्निशन दलाने या कंपनीतील रिॲक्टरचा स्फोट झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे सदरीत कारवाई करण्यात आली आहे. वास्तविक डोंबिवली एमआयडीसीत ९० बॉयलर आहेत. या स्फोटामुळे येथील रहिवाशांच्या मनात भीतीचे वातावरण पसरले आहे. रहिवासी परिसरातून अशा कंपन्या हटवण्याची मागणी या मुळे जोर धरत आहे.डोंबिवली येथील एमआयडीसीतील अमुदान स्फोटातील मुख्य आरोपी असलेले मालती मेहता या नाशिकमध्ये नातेवाईकांच्या घरी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार गुरूवारी रात्रीपासून नाशिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करत त्यांना ताब्यात घेतले. डोंबिवलीमध्ये स्फोट झाल्यानंतर अमुदान कंपनीचे मालक हे फरार असल्याचे पोलिसांच्या लक्ष्यात आले होते. तेव्हापासूनच पोलिसांनी त्यांचा शोध सुरू केला होता. अखेर मोबाईल लोकेशन ट्रेस करुन त्यांना नाशिकमधून शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. यात मालती मेहता या नाशिकमध्ये त्यांच्या नातेवाईकाच्या घरी आश्रय घेण्यासाठी पोहोचल्या होत्या. त्यांना ताब्यात घेत पोलिसांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात नेले होते. तेथील प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना मुंबईत नेण्यात येईल.

## ७५ टक्के गुण घेऊन अपंग विद्यार्थिनी ची गगनभरारी

**शंकरपूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील राजीव गांधी कन्या विद्यालय शंकरपूर येथील वर्ग दहावीला शिकत असलेली व शंकरपूर येथीलच रहिवासी संचिता विनोद शंभरकर ही दोन्ही पायांनी अपंग असताना सुद्धा वर्ग १० च्या परीक्षेत ७५ टक्के गुण घेऊन पास झाली. त्यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

राजीव गांधी कन्या विद्यालय शंकरपुर येथील शिक्षक संच हा मेहनती असून वेळी अवेळी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक समस्या सोडवणे आणि त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मदत करणे, विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाबद्दल चुरस निर्माण करणे यासाठी या विद्यालयातील शिक्षक नेहमीच मेहनत घेत असतात. या शाळेचा नेहमी तालुक्यामध्ये उत्कृष्ट टक्केवारीने निकाल असतो . यावर्षी सुद्धा शाळेचा ९२ टक्के निकाल लागला. यावर्षी सुद्धा दहावीच्या परीक्षेत दोन्ही पायांनी अपंग असतानाही व घरापासून शाळेपर्यंत तीन चाकी हाताने पायडल मारणाऱ्या सायकलने



प्रवास करून आज संचितांने ७५ टक्के गुण घेऊन सर्वांच्या अभिनंदन आज पात्र ठरली आणि जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर हे करू शकतो असे दाखवून दिले गेले. मी अपंग असताना सुद्धा मी कुठेही कमी नाही. इच्छाशक्ती , जिद्द आणि मेहनत असेल तर माणूस कुठेही कमी पडत नाही हे तिने दाखवून दिले. या यशाचे श्रेय तिने आपल्या शाळेतील आदर्शवत शिक्षकांना, आई-वडिलांना दिले असून गावामध्ये तिचे सर्वत्र शुभेच्छा देऊन तिच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## निवडणुक झाली, किमान आता तरी सरकारने जनतेच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे:विजय वडेट्टीवार

**मुंबई–**राज्यात एकीकडे अवकाळी पाऊस तर दुसरीकडे दुष्काळ अशी परिस्थिती आहे. त्यामुळे राज्य सरकारने याकडे लक्ष देण्याची मागणी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. दुष्काळी परिस्थितीवरुन वडेट्टीवार यांनी राज्य सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या पाच टप्प्यात सर्व लोकसभा मतदार संघातील मतदान प्रक्रिया पार पडली आहे. त्यामुळे राज्य सरकारने आता तरी याकडे लक्ष देण्याची मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे. देशातील सार्वत्रिक निवडणुका या सात टप्प्यात होत असल्या तरी राज्यात केवळ पहिल्या पाच टप्प्यातच मतदान प्रक्रिया पार पडली. या पाचही टप्प्यातील मतदान प्रक्रियेबरोबरच राज्यातील मतदान प्रक्रिया आता संपली आहे. सहाव्या आणि सातव्या मतदानाच्या टप्प्यात राज्यातील एकाही मतदार संघात मतदान होणार नाही. त्यामुळे आता राज्य सरकारने दुष्काळ आणि अवकाळीमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांडे लक्ष देण्याची मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.या संदर्भात विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राज्य सरकारवर खोचक टीका केली आहे.



सध्या नवतपा चालू असुन अंगाची लाहिलाही होत असताना नागभीड तालुक्यातील तळोधी रोड रेल्वे स्टेशन लगत रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाच्या सावलीत माकडांचा विसाव्याचे दृश्य मन हरपून जाते. छाया :प्रणय बांगरे.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अडथळा दूर करण्याची पत्राद्वारे मागणी

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरकुला साठी ना.सुधीर मुनगंटीवार सरसावले

## घरकुल लाभार्थ्यांना रेती उपलब्ध करून देण्यात अडचण येत असल्याची व्यथा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय मंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या घरकुलाचे बांधकाम रखडल्याची व्यथा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे व्यक्त केली आहे. घरकुलाच्या लाभार्थ्यांना तातडीने रेती उपलब्ध करून देण्याकरिता केंद्रीय पर्यावरण समितीची मान्यता घेण्यासंदर्भात उपाययोजना करण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

ना.सुधीर मुनगंटीवार यांनी आवास योजनेंतर्गत घरकुलाच्या लाभार्थ्यांना घराच्या बांधकामासाठी रेती उपलब्ध होत नसल्याचा मुद्दा पत्रात मांडला आहे. या लाभार्थ्यांना तातडीने रेती उपलब्ध करून देणे ही





अत्यावश्यक बाब असल्याचे ना. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

महसूल व वन विभागाने रेतीचे उत्खनन, साठवणूक व ऑनलाईन प्रणालीद्वारे विक्री याबाबतचे सर्वंकष धोरण १६ फेब्रुवारी २०२४च्या शासन निर्णयात निश्चित केले आहेत. केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने दिलेल्या निर्देशांनुसार जिल्हाधिकारी खाणकाम आराखडा तयार करून पर्यावरणीय अनुमतीसाठी पर्यावरण समितीकडे आराखडा सादर करण्यात येतो. शासन निर्णयानुसार पंतप्रधान आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील घरकुलांसाठी जास्तीत जास्त ५ ब्रासपर्यंत विनामूल्य रेती उपलब्ध करून देता येते. तसेच जिल्ह्यातील केंद्र व राज्य शासनाच्या प्रकल्पाकरिता स्वामीत्वधन व जिल्हा खनिज निधी रक्कम भरून वाळू घाट राखीव ठेवता येतो. या सर्व बाबींच्या अधीन राहून चंद्रपूर जिल्ह्यातील ६५ रेतीघाटांचा खाणकाम आराखडा तयार करून पर्यावरण मंजुरीकरिता भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातावरणीय बदल मंत्रालयाकडे २० जानेवारी २०२४ ला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सध्या काही कारणांमुळे या घरकुलांच्या बांधकामाला रेती उपलब्ध करून देण्यात अडचण निर्माण झाली आहे, असे ना. सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

### 'त्यांना नवीन घराची प्रतीक्षा'

घरकुलाच्या लाभार्थ्यांनी नवीन घर बांधायचे असल्याने आपले जुने घर पाडले आहे. अशा परिस्थितीत आता त्यांचे जुने घरही राहिले नाही आणि नवीन घरही रेतीच्या अभावामुळे पूर्ण होऊ शकलेले नाही. हे लाभार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून त्यांना नवीन घराची प्रतीक्षा आहे. त्यासाठी त्यांना रेतीची अत्यंत आवश्यकता आहे, असेही ना. मुनगंटीवार यांनी पत्रात म्हटले आहे.

# विविध पदार्थ आणि मजेदार क्रियाकलाप शिका!

**आज दि.३० मे २०२४ रोजी, आम्ही जगभरातील अब्जावधी लोकांनी वापरल्या जाणाऱ्या अविश्वसनीय पिकावर प्रकाश टाकणारा पहिला–वहिला आंतरराष्ट्रीय बटाटा दिवस साजरा करू. हा दिवस जागतिक अन्न सुरक्षा, पोषण, शाश्वत शेती आणि आर्थिक संधींमध्ये बटाट्याची महत्त्वपूर्ण भूमिका ओळखण्याची संधी आहे. चला उल्लेखनीय पिकांच्या जगात जाऊया. सदर महत्त्वपूर्ण संकलित लेख शेतकरीपुत्र– श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींची प्रस्तुती आहे, जरूर वाचा... संपादक.**

बटाटा पिकाची लागवड पुणे, सातारा, नाशिक, अहमदनगर, बीड, औरंगाबाद आणि नागपूर या जिल्ह्यात केली जाते. बटाट्यामध्ये प्रथिने, चुना, फॉस्फरस या सारखी खनिजे, ब आणि क जीवनसत्वे भरपूर प्रमाणात असतात. बटाट्याचा उपयोग खाद्य पदार्थाशिवाय अनेक उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात होतो. बटाटा हे थंड हवामानातील पिक आहे. या पिकास सरासरी १६ ते २१ सेल्सिअस तापमान लागते. पिकाच्या सुरवातीच्या काळात २४ सेल्सिअस पोषक असून बटाटे पोसण्याच्या काळात २० सेल्सिअस तापमान अनुकूल असते. बटाटे लागवडीच्या वेळी उष्ण हवामान व बटाटे पोसण्याचे वेळी थंड हवामान या पिकास पोषक असते. मध्यम ते हलक्या गाळाच्या जमिनीत बटाट्याची लागवड चांगल्या रीतीने करता येते. जमीन कसदार भुसभुशीत व उत्तम निचऱ्याची असावी. जमिनीचा सामू ६ ते ८च्या दरम्यान असावा. जमीन नांगरानी २० ते २५ सेंमी नांगरली जाते. १ महिनाभर जमिनीस उन्हाची ताप देणे आवश्यक असते. पुन्हा १ आडवी नांगरणी केली जाते. ढेकळे फोडण्यासाठी व जमीन समपातळीत आणण्यासाठी कुळवाच्या दोन तीन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करतात, जमिनीत हेक्टरी ५० गाड्या चांगले कुजलेले शेणखत पसरले जाते. बटाट्याची लागवड खरीप हंगामात जून, जुलै महिन्यात करतात व रब्बी हंगामात ऑक्टोंबर, नोव्हेंबर महिन्यात करतात. बटाटा वाण– जात प्रकार– ॡ कुफरी लवकर – ही ६५ ते ८० दिवसात तयार होणारी जात असून खरीप व रब्बी हंगामात घेतली जाते. या जातीचे बटाटे पांढरे शुभ्र आकर्षक व मोठे असतात. या जातीचा बटाटा साठवणुकीत चांगला टिकतो. हेक्टरी उत्पादन २०० ते २५० क्विंटल असते. ॡ कुफरी चंद्रमुखी – ही जात ९० ते १०० दिवसात तयार होते. या जातीचे बटाटे लांबट गोल व फिकट पांढरे असतात. साठवणुकीस ही जात उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन २५० क्विंटल पर्यंत मिळते. ॡ कुफरी सिंदुरी – ही जात १२० ते १३५ दिवसात तयार होते. या जातीचा रंग फिकट तांबडा असून बटाटे मध्यम व गोल आकारचे असतात. ही जात साठवणुकीस उत्तम आहे. हेक्टरी उत्पादन ३०० क्विंटल पर्यंत मिळते. या शिवाय कुफरी बादशाह, कुफरी कुबेर, कुफरी ज्योती, अलंकार, कुफरी चमत्कार या जाती लागवडीस योग्य आहेत.



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

बटाटा, ज्याचे नाव स्पॅनिश शब्द पटॅटापासून आले आहे, जगातील सर्वात सामान्य भाज्या आणि सर्वात महत्वाचे पिकांपैकी एक आहे. बटाटा ही एक अष्टपैलू भाजी आहे. हे मॅश केलेले बटाटे तांदूळ आणि परांठासोबत खाण्यास मदत करते, परंतु स्नॅक्स आणि नाश्त्याच्या डिशसाठी पॅटीज आणि हॅश ब्राऊन बनवण्यासाठी देखील याचा वापर केला जाऊ शकतो. वर्षानुवर्षे बटाट्याचा वापर विविध पदार्थ बनवण्यासाठी केला जात आहे. ही भाजी अनेक संस्कृती आणि देशांचे मुख्य अन्न आहे. बर्याच देशांमध्ये योग्य कारणांसाठी बटाटे मुबलक प्रमाणात घेतले जातात. हा दिवस दरवर्षी जगभरात सर्वात आवडत्या भाज्यांपैकी एकावर प्रकाश टाकण्यासाठी आणि बटाट्यापासून बनवल्या जाऊ शकणार्या पाककृती आणि पदार्थांचा शोध घेण्यासाठी साजरा केला जातो. दक्षिण पेरू आणि बोलिव्हियाच्या वायव्य प्रदेशात बटाट्याची प्रथम लागवड ५००० ते ८००० बीसी दरम्यान झाली, असे मानले जाते. तेव्हापासून ही भाजी बर्याच देशांमध्ये आणि संस्कृतींमध्ये सर्वात पसंतीची आणि मुख्य खाद्यपदार्थांपैकी एक बनली आहे. पॅनकेक्सपासून ब्रेड रोल्सपर्यंत बटाट्याला बहुतेक पदार्थांमध्ये स्थान मिळाले आहे. बटाटे त्यांच्या पौष्टिक मूल्यासाठी देखील ओळखले जातात– हे पोषण इतर कोणत्याही अन्नपदार्थावर अवलंबून न राहता काही महिन्यांपर्यंत एखाद्या व्यक्तीला ऊर्जा प्रदान करू शकते. बटाट्यांद्वारे पुरविलेल्या कॅलरींचा स्थिर स्रोत अनेक शतके आणि देशांतील लोकांना खायला दिला आहे. बटाट्याने दक्षिण अमेरिकेत आपला प्रवास सुरू केला आणि लवकरच तो युरोप आणि देशाच्या इतर भागांमध्ये पोहोचला, जिथे तो गेला तिथे मुख्य आहाराचा एक भाग बनला.



हा विशेष दिवस साजरा करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे बटाट्यांसोबत नवीन पदार्थ बनवण्याच्या शक्यतांचा शोध घेणे आणि कुटुंब आणि मित्रांसह त्याचा आनंद घेणे आहे.

जागतिक बटाटा दिवसाचा उद्देश– बटाटा दिनाचा उद्देश बटाटा एक बहुमुखी आणि प्रिय भाजी म्हणून त्याचे महत्त्व ओळखून साजरा करणे आणि त्याचा सन्मान करणे हा आहे. जगभरातील विविध पाककृतींमध्ये बटाट्यांचे पौष्टिक मूल्य आणि त्यांचे महत्त्व याबद्दल जागरुकता वाढवणे हा यामागचा उद्देश आहे. हा दिवस लोकांना विविध समाजांमधील बटाट्यांचा समृद्ध इतिहास आणि सांस्कृतिक प्रभाव शोधण्यासाठी आणि त्यांचे कौतुक करण्यासाठी प्रोत्साहित करतो. हे स्वयंपाकाच्या उत्साही लोकांना नवीन आणि सर्जनशील बटाटा पाककृती सामायिक करण्याची आणि शोधण्याची संधी प्रदान करते. हा बटाटा दिवस बटाट्याच्या कृषी महत्त्वाला मोठ्या प्रमाणावर घेतले जाणारे पीक म्हणून प्रोत्साहन देतो, अन्न सुरक्षेत योगदान देतो. उत्सव आणि सोशल मीडिया शेअरिंगद्वारे हा दिवस बटाटा उत्साही लोकांमध्ये समुदायाची भावना वाढवतो. हा दिवस कसा साजरा करायचा? तर फ्रेंच फ्राईज, मॅश केलेले बटाटे किंवा बटाटा सॅलड यांसारख्या तुमच्या आवडत्या बटाट्याचे पदार्थ शिजवा आणि त्याचा आनंद घ्या. बटाट्याच्या नवीन रेसिपी वापरून पहा आणि वेगवेगळ्या फ्लेवर्स आणि मसाला वापरून प्रयोग करा. ऑनलाइन सेलिब्रेशनमध्ये सामील होण्यासाठी सोशल मीडियावर तुमच्या सर्वोत्तम बटाट्याच्या पाककृती शेअर करा. बटाटा लागवडीबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी आणि स्थानिक उत्पादकांना पाठिंबा देण्यासाठी स्थानिक बटाटा फार्म किंवा शेतकऱ्यांच्या बाजाराला भेट द्या. मित्र आणि कुटुंबासह बटाटा–थीम असलेली पार्टी आयोजित करा, ज्यामध्ये बटाट्याचे विविध पदार्थ आणि मजेदार क्रियाकलाप आहेत. बटाट्याची रेसिपी बनवण्याची स्पर्धा आयोजित करा किंवा सर्वात नाविन्यपूर्ण बटाट्याची रेसिपी कोण घेऊन येईल हे पाहण्यासाठी मित्रांमध्ये आव्हान द्या. तुमच्या कुटुंबात किंवा संस्कृतीत भावनिक मूल्य असलेल्या पारंपारिक बटाट्याच्या पदार्थांची आठवण करून द्या. गरज असलेल्यांना बटाटे आणि इतर पौष्टिक पदार्थ पुरवण्यावर लक्ष केंद्रित करणार्या फूड बँक किंवा धर्मादाय संस्थांना जरूर भेटी द्या.

बटाटा ही वनस्पती सोलॅनेसी कुलातील असून तिचे शास्त्रीय नाव सोलॅनम ट्यूबरोजम आहे. मिरची, वांगी व टोमॅटो या वनस्पतीही याच कुलात मोडतात. जगभरात मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाणारी बटाटा ही एक खाद्य वनस्पती आहे. ती मूळची दक्षिण अमेरिकेतील पेरू आणि बोलिव्हिया देशांच्या सीमेवर असलेल्या अँडीज पर्वतातील आहे. सोळाव्या शतकात स्पॅनिश दर्यावर्दींनी ती यूरोपात आणली. पोर्तुगिजांनी भारतात पश्चिम किनाऱ्याजवळच्या प्रदेशात बटाट्याची लागवड केली. बटाट्यात असलेल्या पोषक घटकांमुळे अनेक देशांत मानवी आहारामध्ये त्याचा समावेश केला जातो. बटाटा– सोलॅनम ट्यूबरोजम– पाने आणि खोड, बटाट्याचे रोप सर्वसाधारणपणे ०ङ३–१ङ२५ मी. उंच वाढते आणि त्याचे खोड जमिनीलगत पसरते. रोपाची मुळे आगंतुक, मुख्य खोडाच्या पेरावर व जमिनीलगतच्या थरात वाढणारी असतात. खोड लहान, मऊ, जांभळ्या–हिरव्या रंगाचे, त्रिकोणाकृती व पोकळ असते. याच्या शाखांना भूस्तरिका म्हणतात व त्या जमिनीलगत वाढतात. त्यांच्या टोकाला अन्नसंचय झाल्यामुळे ते खोड फुगते आणि मोठे होते. हे फुगलेले खोड म्हणजे बटाटा. बटाट्यावरील डोळे म्हणजे पेरावरील कक्षस्थ कलिका आहेत. बटाट्याची साल पातळ, फिकट पिवळी, क्वचित लाल किंवा जांभळी असते. पाने संयुक्त, लवदार व पिच्छाकृती असून टोकाची पर्णिका मोठी असते. फुले पांढरी व विविधरंगी असून वल्लरीत येतात. पांढरी फुले असलेल्या क्षुपाचे बटाटे पांढऱ्या सालीचे असतात, तर रंगीत फुलांच्या बटाट्यांची साल गुलाबी, लाल, निळी किंवा जांभळी असते. मृदुफळे हिरवी, गोलसर १ङ५–२ङ५ सेंमी. व्यासाची असून त्यांत अनेक चपट्या बिया असतात. त्या बिया विषारी असतात. जगात सर्वत्र मिळून बटाट्याचे सु. ५,००० वाण आहेत. त्यांपैकी सु. ३,००० वाण पेरू, चिली, बोलिव्हिया, एक्वादोर आणि कोलंबिया या देशांत दिसून येतात. सो. ट्यूबरोजम ही जाती आणि तिच्यापासून तयार केलेले आधुनिक वाण यांचीच लागवड जगात मोठ्या प्रमाणावर केली जाते. बटाट्याची लागवड शाकीय पद्धतीने म्हणजे ग्रंथिक्षोडाचे तुकडे लावून करतात. प्रत्येक तुकड्यावर किमान दोन डोळे असावे लागतात. चीनमध्ये बटाट्याची लागवड सर्वाधिक केली जात असून त्यानंतर भारत, रशिया, युक्रेन आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशांचा क्रम लागतो. बटाट्यात ७५ टक्के पाणी आणि २० टक्के स्टार्च हे दोन मुख्य घटक आहेत. यांशिवाय त्यात काही प्रथिने, कॅल्शियम, क जीवनसत्त्व आणि ब समूह जीवनसत्त्वांपैकी निसीन असते. बटाटा हे लवकर पचणारे अन्न आहे. बटाटा उकडून किंवा तळून त्यापासून वेगवेगळे अन्नपदार्थ बनविले जातात. भारतात बटाट्यापासून तयार केलेले वडे, भाजी आणि वेफर मोठ्या प्रमाणावर खाल्ले जातात. उकडलेल्या बटाट्याची साल भारतीय उपचार पद्धतीत भाजलेली जखम बरी करण्यासाठी लावतात. बटाट्यातील स्टार्चचा उपयोग वस्त्र–उद्योगात तसेच व्होडका हे मद्य तयार करण्यासाठी होतो.

!! आंतरराष्ट्रीय बटाटा दिनानिमित्त समस्त शेतकरी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

# चोंडीच्या जयंती कार्यक्रमास केंद्रीय मंत्री आठवले येणार

## आरपीआयच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना उपस्थित राहण्याचे आवाहन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त चोंडी (ता. जामखेड) येथे शुक्रवारी (दि.३१ मे) होणाऱ्या जयंती उत्सव कार्यक्रमासाठी व अभिवादन करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले येणार आहे. या कार्यक्रमासाठी नगर दक्षिण मधून मोठ्या संख्येने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने जाणार आहेत.

ना. रामदास आठवले सकाळी १० वाजता मुंबईहून हेलिकॉप्टरने चोंडी येथे आगमन होणार आहे. यानंतर ते जिल्ह्यातील सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहे. ११ वाजता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती कार्यक्रमात ते उपस्थित राहणार आहेत. यावेळी आरपीआय पक्षाचे संपर्कप्रमुख तथा राज्य उपाध्यक्ष श्रीकांत भालेराव, राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे, राज्य सचिव राजाभाऊ कापसे, राज्य उपाध्यक्ष बाळासाहेब गायकवाड, राज्यसचिव दीपक गायकवाड, विभागीय अध्यक्ष भीमा बागुल, उत्तर जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, शहर जिल्हाध्यक्ष किरण दाभाडे, युवक जिल्हाध्यक्ष विवेक भिंगारदिवे आदी उपस्थित राहणार आहेत.

चोंडी येथील कार्यक्रम संपल्यानंतर ते जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या नान्नज (ता. जामखेड) येथील निवासस्थानी भेट देणार आहे. यानंतर ते करमळा मार्गे पंढरपूरला रवाना होणार आहेत. जिल्ह्यातील



रिपब्लिकन पक्षाच्या सर्व नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना चोंडी येथे सकाळी १० वाजता उपस्थित रहाण्याचे आवाहन दक्षिणचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे व जामखेड तालुकाध्यक्ष बाळासाहेब शिंदे यांनी केले आहे.

# एसटी कामगार संघटनेच्या अहमदनगर विभागाचे नूतन अध्यक्ष रोहिदास अडसूळ व विभागीय सचिव दिलीपराव लबडे यांचा सत्कार समारंभ संपन्न





**अहमदनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील एकमेव मान्यता प्राप्त संघटनेची दि २२मे रोजी अहमदनगर येथे वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. यावेळी अहमदनगर विभागातील सर्व आगाराचे पदाधिकारी व सभासद मोठ्या प्रमाणात हजर होते. यावेळी २०२३ या सालचे विभागीय अध्यक्ष व डि जी अकोलकर व विभागीय सचिव शिवाजीराव कडूस हे महामंडळाच्या सेवानिवृत्त झाल्याने वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २०२३ सालचे विभागीय कार्याध्यक्ष रोहिदास अडसूळ यांची २०२४ या वर्षासाठी विभागीय अध्यक्ष म्हणून तर शेवगाव आगाराचे आगार सचिव दिलीपराव लबडे यांची विभागीय सचिव म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली होती. विभागातील सभासदांचा उत्साह पाहता शेवगाव आहारामध्ये मध्ये आज रविवार दि २६ रोजी फटाक्यांच्या आदेश बाजी मध्ये त्यांचे शेवगाव आगारातील कर्मचारी व अधिकारी व विविध संघटनांचे पदाधिकारी शेवगाव तालुका पत्रकार संघ यांनी त्यांचे अभिनंदन स्वागत केले.


यावेळी शेवगाव आगार पदाची जागा रिक्त झाल्यामुळे जगन्नाथ तुकाराम पवार यांची सर्वांमध्ये शेवगाव आगार सचिव म्हणून निवड करण्यात आली. उपस्थित कर्मचारी व मान्यवरांनी पवार यांचे अभिनंदन करून स्वागत केले. यावेळी इंटक संघटनेचे संजय गीते यांनी आपल्या असंख्य सहकार्यासह कामगार संघटनेचे नेतृत्वावर विश्वास ठेवून संघटनेत प्रवेश केला. यावेळी त्यांचाही सन्मान करण्यात आला.याप्रसंगी अहमदनगर विभागीय कार्यालयाचे माजी सचिव प्रवीण ढगे, माजी अध्यक्ष राहुल जाधव, शेवगाव आगार अध्यक्ष संजय धनवडे, लक्ष्मण लव्हाट, गणेश बर्गे, दत्तात्रय गाडेकर, पांडुरंग देशमुख, उद्धव ठाकरे गट शिवसेनेत शिवसेनेचे तालुकाध्यक्ष तालुका अध्यक्ष अविनाश मगरे, सुनील रासने, एसटी कर्मचारी कृती समितीचे अध्यक्ष क्रॉ अध्यक्ष संजय नांगरे, राजे शिवाजी निधी चे संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव मडके, शेवगाव पत्रकार संघाचे अध्यक्ष कैलास बुधवंत, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, डॉ अमित फडके, इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय नागरे यांनी केले तर आभार पांडुरंग देशमुख यांनी मानले.

## शिंदे गटाच्या नेत्याचा मोठा आरोप

# अल्पवयीन आरोपीच्या आजोबांचे अंडरवर्ल्डशी संबंध:छोटा राजनला दिली होती माझी सुपारी

**पुणे (वृत्तसंस्था)** –पुण्यात पोर्शे कारने २ अभियंत्यांना चिरडणाऱ्या अल्पवयीन आरोपीच्या आजोबांचे अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनशी लागेबांधे असल्याचा गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे पुणे जिल्हा सहसंपर्कप्रमुख अजय भोसले यांनी केला आहे. अल्पवयीन आरोपीचे आजोबा सुरेंद्रकुमार अग्रवाल यांनी एका वादात मला ठार मारण्याची सुपारी छोटा राजनला दिली होती, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या आरोपामुळे अग्रवाल कुटुंबीयांचे एकेक काळे कारनामे उजेडात येत आहेत.

पुण्याच्या कल्याणी नगर परिसरात शनिवारी अल्पवयीन आरोपीने २ तरुण अभियंत्यांना उडवले होते. त्यात दोघांचाही जागीच मृत्यू झाला होता. पण त्यानंतर अवघ्या १५ तासांतच त्याला जामीन मिळाला होता. या प्रकरणी सोशल मीडियात टीकेची झोड उठल्यानंतर पोलिसांनी आरोपीचे वडील विशाल अग्रवाल यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांना छत्रपती संभाजीनगर येथून अटक केली होती. या पार्श्वभूमीवस अजय भोसले यांनी उपरोक्त आरोप केला आहे.अल्पवयीन आरोपीचे आजोबा म्हणजे विशाल अग्रवाल यांचे वडील सुरेंद्रकुमार अग्रवाल यांच्याशी माझा एका प्रकरणात वाद झाला होता. त्यानंतर त्यांनी मला ठार मारण्याची सुपारी अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजनला दिली होती. हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे, असे अजय भोसले यांनी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटले आहे. माझी सुपारी देण्यासाठी सुरेंद्रकुमार अग्रवाल बँकॉकला जाऊन छोटा राजनला भेट होते. या सर्वांचे पुरावे उपलब्ध आहेत. पण अद्याप सुरेंद्रकुमार अग्रवाल यांना अटक झाली नाही. कारण, त्यांच्यावर राजकीय वरदहस्त आहे, असे ते म्हणाले.सुरेंद्रकुमार यांचा आर्थिक व्यवहार जोरात असल्याने ते जातील तिकडे कायदा विकत घेतात. सोप्या शब्दांत सांगायचे तर संपूर्ण अग्रवाल कुटुंब गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहे. कुटुंबातील सर्वच सदस्यांवर २–२ गुन्हे दाखल आहेत. आता या अपघात प्रकरणातही त्यांना आपण पैशांच्या जोरावर सर्वकाही विकत घेऊ असे त्यांना वाटते. ही मोठी माणसे असून, त्यांना कायदा सुव्यवस्थेचा कोणताही धाक नाही, असेही अजय भोसले यावेळी बोलताना म्हणाले.अजय भोसले म्हणाले की, २००९ ची विधानसभा मी शिवसेनेच्या तिकीटावर लढवत होतो. त्यावेळी माझे सुरेंद्रकुमार अग्रवाल यांचे बंधू राम अग्रवाल यांच्याशी चांगले संबंध होते. तेव्हा दोन्ही भावांत १२०० कोटींच्या संपत्तीवरून वाद सुरू होता. तेव्हा मला छोटा राजनचे धमकीचे फोन येत होते. राम अग्रवाल सुरेंद्रकुमार यांना पैसे देत नव्हते. त्यात माझा राम यांना पाठिंबा असल्याचे सुरेंद्रकुमार यांनी छोटा राजनला सांगितले होते.त्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी पुण्यातील जर्मन बेकरीजवळ छोटा राजनच्या शुटर्सनी माझ्यावर गोळीबार केला. पम त्यांचा नेम चुकला. त्यानंतर आम्ही २ किमीपर्यंत गुंडांचा पाठलाग केला. त्यावेळी त्यांनी झाडलेली एक गोळी माझ्या मित्राच्या छातीत घुसली होती. आम्ही त्याला रुग्णालयात घेऊन गेलो. त्यानंतर वर्षभराने आरोपी पकडले तेव्हा त्यांनी सुरेंद्रकुमार अग्रवाल यांनी मला मारण्यासाठी छोटा राजनला सुपारी दिल्याचे कबुल केले. पण अजूनही पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. सुरेंद्रकुमार अग्रवाल यांना हे प्रकरण पैसे देऊन दाबायचे आहे, असेही अजय भोसले यावेळी 'एबीपी माझा'शी बोलताना म्हणाले.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कॅन्सर हॉस्पिटलच्या उद्घाटनाचे निमंत्रण
# ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधानांकडे पत्राद्वारे व्यक्त केली इच्छा

### पंतप्रधानांच्या उद्दिष्टांवर कार्य

आपल्या नेतृत्वात भारतातील आरोग्य सेवेमध्ये अमुलाग्र बदल झाला आहे. सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवणारी यंत्रणा आपण निर्माण केली आहे. कॅन्सर हॉस्पिटलच्या माध्यमातून आपल्या पावलांवर पाऊल टाकण्याचा आमचा हा छोटासा प्रयत्न आहे, असेही ना.मुनगंटीवार यांनी पंतप्रधानांना लिहलेल्या पत्रात म्हटले आहे.

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर येथे आकाराला येत असलेल्या अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटलचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हावे, यासाठी पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला आहे. एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन आपल्या हस्ते व्हावे अशी इच्छा ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात व्यक्त केली आहे.



चंद्रपूर कॅन्सर केअर फाउंडेशनद्वारा संचालित तसेच टाटा ट्रस्ट आणि महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने चंद्रपूर येथे अत्याधुनिक कॅन्सर हॉस्पिटल उभे होत आहे. या हॉस्पिटलचे काम लवकरच पूर्णत्वास येणार असून त्याचे उद्घाटन १५ ऑगस्ट २०२४ च्या दरम्यान करण्याचा मानस पालकमंत्री ना. मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे. 'केवळ चंद्रपूरच नव्हे तर आसपासच्या जिल्ह्यांमधील आणि तेलंगाणा, एकूणच मध्य भारतातील रुग्णांसाठी हे हॉस्पिटल वरदान ठरणार आहे. त्यामुळे अशा प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळयात आपली उपस्थिती एका उत्तम प्रयत्नांचा गौरव करणारी ठरेल. तसेच निरोगी व समृद्ध राष्ट्राच्या दृढ संकल्पाला अधिक बळ मिळेल,' असे ना. मुनगंटीवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. त्याचवेळी १५ ऑगस्ट किंवा त्याच्या आसपासचा कुठलाही दिवस आपण उद्घाटनासाठी दिल्यास आम्हाला आनंद होईल, असेही ना. मुनगंटीवार यांनी म्हटले आहे. 'चंद्रपूर तसेच मध्य भारतातील कॅन्सरच्या रुग्णांना या हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक सोयीसुविधांसह उपचार देण्यात येणार आहे. १४० खाटांनी सुसज्ज असे हे हॉस्पिटल गुणवत्तापूर्ण उपचारासाठी कटिबद्ध असणार आहे. कॅन्सरचा सामना करणाऱ्या रुग्णांच्या आणि नातेवाईकांच्या जीवनात एक नवी आशा निर्माण करण्याचे काम या माध्यमातून होणार आहे,' याचाही ना.सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रात आवर्जून उल्लेख केला आहे.

### पंतप्रधानांच्या नेतृत्वात आरोग्य सेवेचा कायापालट

आयुष्मान भारत योजना, पीएम–जन आरोग्य योजनांच्या माध्यमातून आपण देशातील १० कोटी पेक्षा अधिक कुटुंबांना आरोग्य विम्याचा लाभ मिळवून दिला आहे. आपल्या नेतृत्वात हेल्थ आणि वेलनेस सेंटर्सचा विस्तार, प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी योजनेद्वारा जेनेरिक ड्रग प्रमोशन, राष्ट्रीय आरोग्य अभियान, टेलिमेडिसीन व डिजीटल आरोग्य, कोविड –१९ लसीकरण अभियान, प्रधानमंत्री मातृवंदन योजना आदी क्षेत्रात प्रभावी कार्य झाले आहे. याशिवाय २२ नव्या एम्स संस्थानांना मंजुरी आणि ६९२ पेक्षा अधिक मेडिकल कॉलेजेसचे निर्माण आपल्या नेतृत्वात झाले आहे, याचाही ना. सुधीर मुनगंटीवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात उल्लेख केला आहे.

---

## महात्मा फुले माध्यमिक विद्यालय,तळोधी (बा) दहावीच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



कु.अदिती संदिप कामडी 91.40%



कु.वैष्णवी विकास देशमुख 90.00%



तुषार विजय मदनकर 86.00%



कु.शिवानी जीवन नान्हे 85.60%



कु.संचिता काळसर्पे 85.20%

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

महात्मा फुले माध्यमिक विद्यालय, तळोधी (बा) ता. नागभिड, जि. चंद्रपूर. येथील एस एस सी परीक्षा मार्च २०२४ चा निकाल ९६ टक्के लागलेला आहे.प्राविण्य प्राप्त श्रेणीमध्ये एकूण २७ विद्यार्थी,प्रथम श्रेणीमध्ये ६८ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये ४५ विद्यार्थी व पास श्रेणीमध्येमध्ये ४ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

शाळेतून कु.अदिती संदीप कामडी ही ९१.४० टक्के घेऊन प्रथम क्रमांकाने पास झालेली आहे. द्वितीय क्रमांक कु. वैष्णवी विकास देशमुख – ९०.०० टक्के ,तृतीय क्रमांक– कु. तुषार विजय मदनकर – ८६.०० टक्के चतुर्थ क्रमांक कु. शिवानी जिवन नान्हे ८५.६० टक्के पाचवा क्रमांक– कु. संचिता विलास काळसर्पे – ८५.२० टक्के गुण मिळवून पास झालेले आहेत.सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कल्याण शिक्षण संस्था नागपूर चे अध्यक्ष उन्मेष गेडाम तसेच सरचिटणीस मालती गेडाम ,मुख्याध्यापक जी.जे. बुलबुले,उपमुख्याध्यापक कोराने पर्यवेक्षक कोहपरे आणि सर्व शिक्षक वर्गाने सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले.

---

## गोंडपिपरीत खरीप पूर्व नियोजनाची आढावा बैठक संपन्न

### कृषी केंद्र संचालकांना सक्तीच्या सूचना

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

खरीप हंगामाला सुरवात झाली आहे.बियाणे पेरणीसाठी शेतकरी मान्सूनच्या प्रतीक्षेत आहे.तालुक्यात ३६०४ मेट्रिक टन युरिया खत उपलब्ध झाले आहे.याच पार्श्वभूमीवर खरीप पूर्व नियोजनाची बैठक दि २८ मंगळवारी पंचायत समिती गोंडपिपरी येथे पार पडली. कृषिकेंद्र संचालकांना यावेळी सक्तीच्या सूचना देण्यात आल्या व कीटकनाशके विक्री करताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.यावेळी जिल्हा गुननियंत्रक अधिकारी श्रावण बोडे,तालुका कृषी अधिकारी सचिन पानसरे,पंचायत समिती कृषी अधिकारी महिंद्र डाखरे, सवर्ग विकास अधिकारी चनफणे,




एग्रो डीलरचे तालुका अध्यक्ष भारत झाडे,विस्तार अधिकारी मुरलीधर लटये,मनोज नरहरशेट्टीवार,किर्तीमंत मंगर,गुणवंत कुबडे,तीवाडे,किशोर सुरकर,विजय गुरणुले यांच्यासह शेकडो कृषिकेंद्र चालकांची उपस्थिती होती.

---

## दिंद्रुड चा सरपंच, भावाच्या संगनमताने पत्रकारावर गुंडांचा प्राणघातक हल्ला

**माजलगाव । प्रतिनिधी**

शेख हमीद तालुक्यातील दिंद्रुड ग्रा.पं.चे सरपंच अजय कोमटवार व त्याचा भाऊ अमित कोमटवार यांच्या विरोधात बातम्या का लावतो म्हणत त्यांच्याच संगनमताने माजलगाव शहरातील गुंडां कडून दिंद्रुड येथील सा. दिव्या वार्ताचे पत्रकार सय्यद अखील मोहमद यांच्या वर लोखंडी रॉड, तलवारीने प्राण घातक हल्ला

केल्याची घटना घडली. हल्ल्या प्रकरणी सय्यद अखील मोहमद यांनी २४मे रोजीच्या रात्री ९ वा. माजलगाव शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी नुसार ते व त्यांचा मित्र सचिन गुलाबराव देशमाने रा. दिंद्रुड, ता. माजलगाव असे दोघ २०मे रोजीच्या दुपारी ४ते ४:३० वा.च्या सुमारास माजलगाव तहसिल कार्यालया कडे जात होते ते बायपास रोडवर असलेल्या पंचमुखी हनुमान मंदिरा समोर असताना त्यांच्या मोटार सायकल ला प्रकरणी आरोपी

अविनाश गायकवाड (गब्बर) सोबत दोघे यांनी त्याची मोटार सायकल आडवी लावली. यानंतर अखील हे त्यांच्या मोटार सायकल वरुन खाली उतरले व म्हणाले की, मोटार सायकल आडवी का लावली असे म्हणताच अविनाश म्हणाला की, काय रे लय माजलास का, सरपंच अजय दिलीप कोमटवार व त्यांचा

भाऊ अमित दिलीप कोमटवार यांच्या विरोधात बातम्या का छापतोच शिविगाळ करून तुला जीवे मारुन टाकुत म्हणत मारहाण केली. दरम्यान मागुन प्रकरणातील तीघे अनओळखी आरोपी मोटार सायकल वरुन आले आणि त्यांनी अखील च्या डोक्यावर लोखंडी रॉड ने मारहाण करून गंभीर जखमी केले. तेवढयात अविनाश गायकवाड याने एका मोटार सायकल ला लावलेली धारदार तलवार आणुन हत्वा केला. अश्या आशयाच्या सय्यद अखील मोहमद यांच्या फिर्यादी वरुन अविनाश गायकवाड, अजय दिलीप कुमार, अमित दिलीप कोमटवार व इतर ४अनओळखी आरोपीं विरोधात भादंपीकलम ३४१,५०४,३२३,३२४,५०६ सह भारतीय हत्यार कायद्याच्या कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढिल तपास पोनि. केतन काशीनाथ राठोड करीत आहेत.

---

## दिवाळीपूर्वीच विधानसभा निवडणूक ?

**मुंबई । प्रतिनिधी**

देशात लोकसभेच्या निवडणुका सुरू आहेत. ४ जून रोजी लोकसभेचा निकाल येणार आहे, त्याआधीच आता राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मुंबईत बैठक होणार आहे. या बैठकीत आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीबाबत आढावा घेण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे. राज्यात विधानसभा मतदान होणार असल्याचे बोलले जात आहे. यामुळे आता राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. राज्यातील लोकसभेचे मतदान संपल्यानंतर युती आणि आघाडीच्या नेत्यांमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपाची चर्चा सुरू झाली आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आज मुंबईत पदाधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत विधानसभा निवडणुकांबाबत चर्चा होणार असल्याचे बोलले दिवाळीपूर्वीच जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस निवडणुकीचे पक्षात उभी फूट पडून काही महिने झाले. पक्ष फुटीनंत अजित पवार पहिल्याच सभेन विधानसभा निवडणुकीत ९ जागा लढणार असल्याचे जाही केले होते. महायुतीमध्ये आत पुन्हा एकदा जागावाटपाच्च चर्चा सुरू झाल्याचे बोलले जा आहे. लोकसभा निवडणुकी अजित पवार यांच्या वाटेल ४ जागा आल्या होत्या. आत विधानसभा निवडणुकीत कित जागा मिळणार या चर्चा सु आहेत. राज्यात निवडणुकांसाठीचे लोकसभ मतदा संपताच आता भाजपानेह विधानसभा निवडणुकांच्च तयारी सुरू केली आहे.

---

## त्र्यंबकेश्वर माध्यमिक विद्यालयाचा ९६.२५ टक्के निकाल
## निकिता भाकरे ९४.४० टक्के घेऊन आपेगाव केंद्रातुन प्रथम

**विहामांडवा । प्रतिनिधी**

पैठण तालुक्यातील नवगाव येथील त्र्यंबकेश्वर माध्यमिक विद्यालयातील इयत्ता दहावीचा निकाल ९६.२५ टक्के लागला आहे. या विद्यालयातील निकिता गंगाधर भाकरे हिने आपेगाव केद्रातुन प्रथम येणाचा मान मिळवला.या परीक्षेत निकीता गंगाधर भाकरे हिने ९४.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला. माधुरी मनोहर भावले हिने ९२.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. तर कार्तिक गणेश गलधर याने ९२ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला. तसेच शेख वाजेद ९१.८० टक्के,सुप्रिया पवार ९१.८० टक्के, राज्यश्री भावले ९१.६० टक्के, प्रणाली चौधरी ९०.४०टक्के, शेख महेक ९०.४०टक्के, आमृता भावले ९०टक्के, शेख सिफा ८९.२०टक्के, पाचे अश्विनी ८९.२०टक्के, भाग्यश्री भावले ८८.००टक्के, सार्थक साबळे ८८.००टक्के, शेख कैफ ८७.२०टक्के, साबळे धनश्री ८७.२०टक्के, भावले राधिका ८६.६०टक्के, अक्षरा भावले८६.६०टक्के, शेख शाफिया ८६.४०टक्के, कोमल गायके८६.४०टक्के, शेख जुनेरा ८५.८०टक्के,बलैया अंजली ८५.८०टक्के, शेख आनम ८५.४०टक्के, पठाण मदिया ८५.२०टक्के आदी विशेष श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यालयाने चांगल्या निकालाची परंपरा कायम राखली. ८० विद्यार्थ्यांपैकी ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.त्यात विशेष प्राविण्य ४४ विद्यार्थी,प्रथम श्रेणीत २३ व द्वितीय श्रेणीत १० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.या विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक उल्लास बेतवार, ए. व्ही केदार, एस. जे. पठाण, श्रीमती एस. खिंडारी, यु.बी. परळकर, एम.जे. रावस, डि.टी. डुकरे,इम्तीयज शेख, नजीर खान आदींनी शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

---

## मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल हम दो हमारे बारा चित्रपट निर्मात्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा.जोएफ जमादार

**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

हम दो हमारे बारा या चित्रपट निर्मात्यांनी सदरील चित्रपटात मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन जे.जे.फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जोएफ जमादार आणी सामाजिक कार्यकर्त्यांनी श्रीरामपूर शहर पोलिस स्टेशन चे पोलिस उपनिरीक्षक समाधान सोळूंके यांना दिले आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की, आपल्या भारत देशामध्ये हल्ली नवीन संस्कृती उदयास आली आहे, ती म्हणजे मुस्लिम समाजाचा द्वेष करणे, जाती–जातीमध्ये जातीय तेढ निर्माण करणे अशी सध्याची अवस्था झालेली आहे. या पुर्वी कश्मीर फाईल्स, केरला स्टोरी आणि अता हम दो हमारे बारा असे वादग्रस्त चित्रपट बनवण्यात



आलेले असून या चित्रपटाचे निर्माते रवी गुप्ता, वीरेंद्र भगत आणि संजय नागपाल यांच्यावर मुस्लिम समाजाच्या व विशेषत: मुस्लिम महिलांच्या भावना दुखावल्याबद्दल सदरील चित्रपट निर्मात्यांवर त्वरित भा.द वि. कलम १५३,१५३ अ,१५३ ब, २९५ अ, २९८ ,५०४,५०५, ५०६,५०९ व ३४ आणि तसेच महिती व तंत्रज्ञान कायदा २००० कलम ६६ अ व ६६ फ इत्यादी कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात यावी.कारण यामुळे मुस्लिम समाजात प्रचंड रोष निर्माण होवून पुढे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता ही नाकारता येवू शकणार नाही करीता वेळेतच दखल घेवून उचित कार्यवाही केलेली योग्य राहील या हेतून सदरील नम्र निवेदनाद्वार विनंती असल्याचे म्हटले आहे. याप्रसंगी जे.जे. फाऊंडेशनचे संस्थापक,अध्यक्ष जोएफ जमादार,आसिफ तांबोळी, कलीम शेख, रउफ शेख, सलमान शाह,आदी उपस्थित होते.

---

## लोकविद्यालय तळोधी (बा.) शाळेचा उत्कृष्ट निकाल

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

दहावीचा निकाल सोमवारला जाहीर झाला.परीक्षेत दी रूरल एज्युकेशन सोसायटी ब्रम्हपुरीद्वारे संचालित लोकविद्यालय तळोधी (बा.) ने दरवर्षीच्या यशाची परंपरा कायम राखत यंदाही ९३.१३ टक्के निकाल दिला आहे. सम्यक घनश्याम बागडे हा ८९.६० टक्के गुणासह प्रथम आला. तर अनुष्का अतुल आमले ८५.८० टक्के गुणासह द्वितीय, दिप्ती एकनाथ गहाने ८३.६० टक्के गुणासह तिसरी, मंथन अनिल बोरकर ८०.२० टक्के गुणांसह चवथा आला आहे.शाळेच्या एकूण निकालात प्राविण्य श्रेणीत ६ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत ४५,द्वितीय श्रेणीत ४०,तृतीय श्रेणीत ४ उत्तीर्ण झाले आहेत.

यशस्वी विद्यार्थ्यांचे दी रूरल एज्युकेशन सोसायटी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व्ही. एस. तोंडरे, सचिव आर. एस. राऊत, व्ही. एस. बगमारे, ए. आर. नागमोती, ए. एम. राऊत, डी.पी. समर्थ, मुख्याध्यापक ए.वाय.बांगरे, ज्येष्ठ शिक्षक पी. यु. गिरडकर,पी. बी.पाकमोडे,ए.एन. कोहळे, एस.व्ही. बालमवार,आर.एम.निनावे, संतोष नन्नावार,सोनल उंबरकर,अजय सगळाम, के.वाय. नागपूरकर, ज्योती निकोडे, शिशिर कोरेकर , एकनाथ भगत, मिलिंद कामडी, संजय शेंडे, सुरेश कुंभरे आदींनी कौतुक केले आहे. यावेळी विद्यार्थ्यांच्या घरी सत्कार पुष्पगुच्छ व मिठाई देऊन सत्कार करण्यात आला.



सम्यक घनश्याम बागडे 89.60%



कु. अनुष्का अतुल आमले 85.60%



कु. दिप्ती एकनाथ गहाने ८३.६०%



मंथन अनिल बोरकर ८०.२०

---

## आर.के.ज्ञानमंदिरांचा निकाल १०० टक्के

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक आर के ज्ञानमंदिरम या इंग्रजी माध्यमाच्या शाळेचा निकाल१०० टक्के लागला असून अथर्व मुरलीधर किलोर हा विद्यार्थी ९१.४० टक्के गुण घेऊन प्रथम आला आहे तर कु. नयना मुकेश दुहान ८९.८० टक्के गुण घेऊन द्वितीय आणि कु. संस्कृती प्रशांत चौधरी ८९.४० टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. ज्ञान मंदिर मध्ये आयोजित एका छोटेखानी कार्यक्रमात या तीनही विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी आर.के.हायस्कूल ट्रस्ट चे मुख्य समन्वयक नूरसिंग जाधव,प्रभारी मुख्याध्यापिका प्रीती बिडकर, कु.मनीषा मिश्रा, शम माधुरी धवस, कु.प्रथा तिवारी







उपस्थित होते. आर के ज्ञान मंदिरम ने उत्कृष्ट निकाल दिल्याबद्दल आर के हायस्कूल ट्रस्टचे अध्यक्ष हरीप्रकाशजी केजरीवाल, आर के शाळा समितीचे अध्यक्ष रंजनकुमार केजरीवाल, विश्वस्त द्वारकादास दरक, संस्थेचे प्राचार्य संजय सहारे, उपमुख्याध्यापिका माया वंडलकर, जुनिअर कॉलेजचे उपप्राचार्य सुनील भोयर, पर्यवेक्षक गणेश इंगळे व एल आर यादव यांनी विद्यार्थी तथा शिक्षकांचे अभिनंदन केले.

# मतमोजणी प्रक्रिया पारदर्शकपणे व अचूक करा–जिल्हाधिकारी गौडा

## अधिकारी, कर्मचारी, सुपरवायझर व सहायकांचे प्रशिक्षण

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी ४ जून २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, एम.आय.डी.सी. परिसर, पडोली येथे होणार आहे. निवडणूक प्रक्रियेतील हा अतिशय महत्वाचा आणि शेवटचा टप्पा आहे. कोणतीही चूक झाली तर संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे मतमोजणी प्रक्रिया पारदर्शकपणे व अचूक करा, अशा सुचना निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या. प्रियदर्शनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह येथे मतमोजणीकरीता नियुक्त अधिकारी, कर्मचारी, सुपरवायझर, सहायक, सुक्ष्म निरीक्षकांच्या प्रशिक्षण दरम्यान ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे, निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, सहायक निवडणूक अधिकारी डॉ. सुहास गाडे (आर्णि), नितीनकुमार हिंगोले (वणी), विशालकुमार मेश्राम (बल्लारपूर), संजय पवार (चंद्रपूर), रविंद्र माने (राजुरा) आणि शिवनंदा लंगडापुरे (वरोरा) उपस्थित होते.केंद्रीय निवडणूक



आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करूनच मतमोजणीची प्रक्रिया राबवावी, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, जलदगतीने मतमोजणी पेक्षा अचूकपणे मतमोजणी करा. संबंधित सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी मतमोजणी केंद्रात गोपनीयता व नि:स्पक्षता राखणे आवश्यक आहे. कोणताही निष्काळजीपणा होऊ देऊ नका. आपल्याकडून थोडी जरी चूक झाली तर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात, याची सर्वांनी जाणीव ठेवावी. त्यामुळे आपले वर्तन हे अत्यंत जबाबदारीचे असावे. सहायक निवडणूक अधिकारी स्तरावर सुद्धा प्रशिक्षणाची माहिती द्यावी. मतमोजणी करतांना उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधींना प्रक्रियेबाबत अवगत करा व त्यांना प्रक्रिया दाखवा.नियुक्त अधिकारी – कर्मचा-यांनी मतमोजणी केंद्रावर ठरवून दिलेल्या निर्धारित वेळेपेक्षा आधीच पोहचावे. प्रवेशासाठी दिलेले ओळखपत्र सोबत ठेवा. कोणत्याही स्टाफला मोबाईल, कॅमेरा, आयपॅड, लॅपटॉप किंवा इलेक्ट्रॉनिक वस्तु मतमोजणी केंद्राच्या आतमध्ये नेण्यास मनाई आहे, याची प्रत्येकाने नोंद घ्यावी. यापूर्वीसुध्दा मतमोजणी प्रकियेत भाग घेतला असला तरी अतिआत्मविश्वास बाळगू नका. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आणखी उजळणी करून घ्यावी. यानंतरचे शेवटचे प्रशिक्षण ३ जून रोजी मतमोजणी केंद्रावर होणार आहे, याचीसुध्दा सर्वांनी नोंद घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या.यावेळी मतमोजणी संदर्भात कायदेशीर प्रक्रिया आणि ईव्हीएम मतमोजणीबाबत उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार यांनी तर पोस्टल बॅलेट आणि सर्व्हिस मतपत्रिका मोजणीबाबत अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी उपस्थितांना प्रशिक्षण दिले. तत्पूर्वी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष पवार यांनी प्रास्ताविक केले.

# तालुका काँग्रेस कमिटीचा उपविभागीय अभियंता कार्यालयावर धडक मोर्चा

**चिमूर । प्रतिनिधी**

सध्या उन्हाळा सुरु असून नवतपा सुरू आहे. आणि तालुक्यातील तापमान ४७ डिग्री च्या वर गेले आहे. व चिमूर तालुक्यात अनेक दिवसापासून रात्र दिवस खंडित विज पुरवठा होत असल्यामुळे तालुक्यातील जनतेला पिण्याच्या पाण्याची समस्या उद्भवलेली असून त्याना पिण्यायोग्य पाणी मिळत नसल्यामूळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परीनाम होत आहे. तसेच लहान मुले व जनतेला उष्णतेच्या लाटेमुळे राहणे कठीन झाले आहे. लहान मुले उखाड्यामुळे झोपू शकत नाही. तसेच वयोवृष्ट लोकाच्या प्रकृतीवर परीणाम पडत आहे. रात्रीच्या वेळेसही विजेचा लपंडाव सुरु असल्यामुळे जनतेला फारच त्रास सहन करावा लागत आहे. चिमूर शहरात तसेच संपूर्ण तालुक्यात दिवसभरात दहा वेळा लाईट जात असते.

त्यामुळे चिमूर तालुक्यात गेल्या चार-पाच



दिवसापासून रात्र दिवस होत असलेल्या खंडीत विज पुरवठ्यावर तात्काळ उपाय योजना करावी, अशा प्रकारचे निवेदन राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर यांच्या उपस्थिती मध्ये देण्यात आले. या वेळी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस गजानन बुटके, चिमूर तालुका अध्यक्ष डॉ. विजय गावंडे, जेष्ठ नेते विवेक कापसे, चिमूर विधानसभा युवक काँग्रेस रोशन ढोक, तालुका उपाध्यक्ष राजू चौधरी, माजी उपसभापती शांताराम सेलवटकर, जिल्हा महिला काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष सविता चौधरी, माजी पंचायत समिती सदस्य भावना बावनकर, मोहिनकर , माजी उपसभापती स्वप्नील मालके, सरपंच रामदास चौधरी, सरपंच भोजराज कामडी, सुधीर जुमडे, लटारू सूर्यवंशी, सुभाष करारे, रुपचंद शास्त्रकर,विलास मोहिनकर, पांडुरंग डोये, प्रमोद धाबेकर, मनोज खेटमाली, स्नेहल शंभरकर, श्रीकांत गेडाम व काँग्रेस पदाधिकारी शेतकरी उपस्थित होते.

# भाजपाच्या वतीने मुल येथे क्रांतिवीर वि.दा.सावरकर जयंती

**मूल । प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य सेनानी, समाज सुधारक, हिंदुत्व संकल्पनेचे प्रणेते क्रांतिवीर वि. दा. सावरकर यांची जयंती दिनांक २८ मेला भाजपा कार्यालय मुल येथे भारतीय जनता पार्टीच्या वतीने साजरी करण्यात आली .

यावेळी उपस्थितांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेचे पूजन व मालार्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा ओबीसी मोर्चा चे मूल शहराध्यक्ष युवराज चावरे यांनी केले. त्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी स्वातंत्र्यासाठी केलेल्या कार्याची व योगदानाची माहिती दिली. त्यानंतर पंचायत समिती मूलचे माजी सभापती चंदू मारगोनवार, नगरपरिषद मूल चे माजी उपाध्यक्ष प्रवीण मोहुर्ले, भाजपा नेते सुखदेव चौथाले यांनी क्रांतिवीर सावरकर



यांच्या जीवनावर प्रकाश टाकून उपस्थितांना मार्गदर्शन केले व स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचार व देशभक्ती आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाला नगरपरिषद मूलचे माजी उपाध्यक्ष नंदकिशोर रणदिवे, माजी नगरसेवक अजय गोगुलवार, अनील साखरकर, प्रशांत समर्थ, मिलिंद खोब्रागडे, प्रशांत बोबाटे, बबन गुंडावार, विवेक मांदाडे ,आस्तिक मेश्राम, प्रशांत कोहळे व भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांचे आभार माजी नगरसेवक अनिल साखरकर यांनी मानले.

# चिमूर येथे आभार सभा व समीक्षा नंन्नावरे हिचा सत्कार कार्यक्रम संपन्न

**चिमूर । प्रतिनिधी**

२९ मे ला काँग्रेस कार्यालय चिमूर येथे लोकसभा क्षेत्रातील इंडिया आघाडीचे व काँग्रेस पदाधिकारी, जेष्ठ पदाधिकारी, बुथ अध्यक्ष, महिला, युवक, युवती, फ्रंटल चे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी निवडणूकीत भरपूर मेहनत घेतली. त्या निमित्ताने इंडिया आघाडीचे उमेदवार डॉ. नामदेवराव किरसाण यांनी सर्वांचे आभार मानले.

तसेच सोनेगाव बेगडे येथील शेतकरी कन्या समीक्षा शंकर नंन्नावरे या विद्यार्थिनीची आयआयटी हेंदराबाद येथे एमए डेव्हलपमेंट स्टडी या अभ्यासक्रमासाठी निवड झाली. त्यानिमित्ताने त्या विद्यार्थिनीचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी राज्य मंत्री तथा महासचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ. अविनाश वारजुकर, महासचिव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी डॉ. नामदेवराव किरसाण, राष्ट्रीय उपाध्यक्ष ओबीसी महासंघ महाराष्ट्र प्रदेश तथा समन्व्यक चिमूर विधानसभा डॉ. सतिश वारजुकर, महासचिव महाराष्ट्र प्रदेश सेवादल राम राऊत , गडचिरोली जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्ष महेंद्र ब्राम्हणवाडे, काँग्रेस जेष्ठ नेते धनराज मालके, जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा काँग्रेस कमिटी सरचिटणीस गजाजन बुटके, चिमूर तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष डॉ. विजय गावंडे, किसान तालुका अध्यक्ष राजू कापसे, माजी अध्यक्ष संजय घुटके, तालुका उपाध्यक्ष राजू चौधरी, तालुका उपाध्यक्ष रहेमान पठाण, जिल्हा उपाध्यक्ष महिला काँग्रेस सविता चौधरी,अनुसूचित जाती तालुका अध्यक्ष नर्मदा रामटेके, माजी पंचायत समिती सदस्य भावना बावनकर, चंदाताई कारेकर, शिवसेना प्रमुख भावराव ठोंबरे, तालुका सचिव विजय डाबरे, शहर अध्यक्ष अविनाश अगडे, ओम खैरे, वरखडे काकाजी विवेक कापसे, शांताराम सेलवटकर, रामदास चौधरी, स्वप्नील मालके, रुपचंद शाश्त्रकार, चिमूर विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष रोशन ढोक, युवक काँग्रेस अध्यक्ष नागेद्र चट्टे, मीडिया प्रमुख पप्पू शेख, सरपंच भोजराज कामडी, चरणदास वाघ, जावा भाई शेख, मंगेश घ्यार, अक्षय लांजेवर, श्रीकांत गेडाम, अक्षय नागरिकर, राकेश नंदूरकर, रोहन नंन्नावरे, विजय गायधणी, उपरे साहेब, मनोज खेटमाली, गणेश दहिकर, आकाश श्रीराम, आकाश श्रीरामे, दत्तू तळवेकर, कवडू येरणे, रामभाऊ सावसाकडे, बबन निकोडे, प्रमोद दाबेकर,अजय भिलकर, लटारू सूर्यवंशी, सुभाष करारे, सुधीर जुमडे, जाबीर कुरेशी, शुभम बोबडे, पांडुरंग डोये, दिलीप सुर, अमित मेश्राम, व संपूर्ण इंडिया आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# गोकुळ महाविद्यालयाच घवघवीत यश

**कळमनुरी । प्रतिनिधी**

सविस्तर वृत्त असे की गोकुळ उच्च माध्यमक विद्यालयाचे १२वी परीक्षेत घवघवीत येळेगाव (गवळी) कळमनुरी तालुक्यातील येळेगाव (गवळी) येथील गोकुळ उच्च माध्यमिक विद्यालय येळेगाव विद्यालयाचा विद्यार्थ्यांचा बारावी परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे या विद्यालयाचा सरासरी निकाल९०% लागला असून विज्ञान शाखेचा ९८.५२% तर कला शाखेचा ८०.३२% लागला. विज्ञान शाखेतून पठाण आयेशा अकबर खाँ हिने ६५.५०% नितीन खाडे मनीषा दगडू ६२% तर मगर अंजली ६०.५०% गुण घेतले तर कला शाखेतून काष्टे शिवानी कुंडलीक हिने ७७.५०% (प्रथम) व्यवहारे गोपिका गोविंद७५.१७ नितीय तर पुरी आरती दुर्गाप्रसाद ७३.६७% तृतीय गुण मिळवून यश संपादन यावेळी संजीवनी शिक्षण प्रसारक मंडळ संस्थान श्री शिंदे पी.डी तसेच शाळेची मुख्याध्यापक शिंदे आर.मु. तसेच यावेळी उच्च माध्यमिकचे शिक्षक प्रा. सूर्यवंशी बी.जी. प्रा. रणवीर पी.डी प्रा. दवणे आर. वाय.प्रा. कोंडावार पी.बी.प्रा. शिंदे पी.डी प्रा. शिंदे ए.पी. प्रा. देशमुख एस. बी.प्रा. पुंगारे ए एम. जे. शिंदे आर .बी जैस्वाल एम . एस तसेच कऱ्हाळे के.बी. शिक्षक यावेळी शाळेतील कर्मचारी उपस्थित होते त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आदर्श पदवी महाविद्यालयात विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु;विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याचे आवाहन

**गडचिरोली । प्रतिनिधी**

गोंडवाना विद्यापीठाचे घटक महाविद्यालय असलेल्या आदर्श पदवी महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता विविध पदवी व डिप्लोमा अभ्यासक्रमांसाठी आजपासून (दि.२९ मे) प्रवेश प्रक्रियेला सुरवात झाली आहे. तरी, जिल्ह्यातील तसेच विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रवेशोच्छूक विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रत्यक्ष येवून आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन आदर्श पदवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमुदाला चंद्रमौली यांनी केले आहे.

**विविध पदवी व डिप्लोमा अभ्यासक्रम:**

४ वर्ष कालावधीचे बी.बी.ए. (फॉरेस्ट मॅनेजमेंट अँड ईको टुरीजम), बी.एस.सी. डाटा सायन्स पदवी अभ्यासक्रम, १ वर्ष कालावधीचे डिप्लोमा इन अकाउंट अँड ऑडीटींग, सोशल प्रोग्राम ऑन डीक्शन इन रुरल कम्युनिटी (स्पार्क), डिप्लोमा इन न्यु मिडीया जर्नालिजम हा अभ्यासक्रम, तसेच १ वर्ष कालावधीचे सर्टीफिकेट इन ट्रायबल-लॉ, सर्टीफिकेट इन सोशलवर्क अभ्यासक्रम त्यासोबतच, ६ महिने कालावधीचे सर्टीफिकेट इन पायथन, सर्टीफिकेट इन इव्हेंट अँड हॉस्पीटॅलीटी मॅनेजमेंट, सर्टीफिकेट कोर्स फॉर प्रॅक्टीसींग अकाउंट तसेच सर्टीफिकेट इन गोंडी स्पिकींग यासारखे विविध पदवी, डिप्लोमा अभ्यासक्रम आणि सर्टीफिकेट कोर्सेस आदर्श पदवी महाविद्यालयात आहेत.

त्यासोबतच, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय मान्यताप्राप्त तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० नुसार विद्यार्थ्यांना प्लेसमेंट आणि अप्रेटींसशिप कालावधीत रु. ८ हजार स्टायपेंड देणारे बी.एस.सी. इन मार्केटींग अँड सेल्स(फार्मा अँड मेडीटेक), बी.ए. इन मिडीया कम्युनिकेशन, बी.कॉम. इन रिटेल ऑपरेशन मॅनेजमेंट आदी ४ वर्ष कालावधीचे पदवी अभ्यासक्रम आहेत.

**आदर्श पदवी महाविद्यालयाची वैशिष्ट्ये:**

अप्रेंटिसशिप एम्बेडेड पदवी कार्यक्रम, व्यावसायिक कौशल्य विकास अभ्यासक्रम, महाविद्यालयाची सुसज्ज व भव्य इमारत, अनुभवी, तज्ञ व उच्च विद्याविभूषित नियमित प्राध्यापक वर्ग, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनींकरीता विद्यापीठात वसतिगृहाची सोय, सुसज्ज ग्रंथालय व वाचन कक्षाची सोय, क्रीडा व शारीरिक शिक्षणाची सोय, कमवा व शिका योजना, रोजगार केंद्र (प्लेसमेंट सेल), आदिवासी संस्कृती व कला संवर्धन केंद्र, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता आरोग्य सेवा, तसेच महाविद्यालय परिसरात उपहारगृहाची सुविधा देखील उपलब्ध आहेत. प्रवेशासंबधी तसेच अभ्यासक्रमाच्या अधिक माहितीकरीता आदर्श पदवी महाविद्यालयाचे समन्वयक भरत घेर (९४०४१२६१७८), सह-समन्वयक गुरुदास आडे (७४९८६२०३४९), प्रवीण गिरडकर (९९२३४८०५२५), मुकूल पराते (७४४७३१६७९१), विठ्ठल कोरडे (७०३८५२८५५८) यांच्याशी संपर्क साधावा.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .